# अवचित होता भेट तुझी

सौ. शोभा सतीश राऊत

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B 282

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अवचित होता भेट तुझी : सौ. शोभा सतीश राऊत**

© **सौ. शोभा सतीश राऊत**

'शब्दांगण' प्लॉट नं.-१७,
जरगनगर, कोल्हापूर.
फोन-०२३१-२६३७७७८, मो. ९९२३८९७८९८

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
पहिली आवृत्ती- २००६, दुसरी आवृत्ती- २००९,
तिसरी आवृत्ती- २०१३, चौथी आवृत्ती- २९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ ३१०/-

माझा मुलगा चि. सुमीत आणि सून सौ. समृद्धी,
ज्यांच्यामुळे माझे घर हासते, बागडते, आनंदाने
बहरते, डोलते अशी माझी नातवंडे
चि. शौर्य व चि. धैर्य यांना
शुभ आशीर्वादासह भेट...

# १

“आई दार उघड, मी कपडे प्रेस करतेय.”

“उघडते, कोण एवढ्या वेळा बेल वाजवते आहे कोण जाणे!”

“अरे, जयसिंह ये.”

“कशा आहात तुम्ही?”

“ठीक.”

“किती दिवसांनी आलास. आठवण येत नाही की काय?”

“असं कसं होईल? नूपुर आहे ना घरात?” जयसिंहने विचारले.

“तू बैस. मी बोलावते तिला.” वसुंधराबाई आत गेल्या.

“नूपुर, जयसिंह आलाय.”

“जयसिंह! अरेच्चा!”

नूपुरने घाईगडबडीने लाईटचे बटण ऑन केले. इस्त्री बाजूला ठेवली आणि ती लगबगीने हॉलमध्ये आली.

“हाय सरकार!”

“हाय नूपुर!”

''कसे आहात? किती दिवसांनी भेट होतीय आपली? नाही म्हणजे तुम्ही मोऽऽऽठ्ठी माणसं, आमच्यासारख्यांना भेटायला वेळ थोडाच मिळणार? फोन केला तर फोनवरही तुम्ही भेटत नाही आणि तुमचे सेवक तुम्हाला माझा निरोप देत नसावेत. कदाचित तेही खूऽऽप बिझी असतील... शेवटी सरकारांची नोकर माणसंही मोठीच ना!''

''नूपुर... साष्टांग नमस्कार करू की कान पकडून उठाबशा काढू?''

''सरकार, तुम्हाला शिक्षा करण्याची आमच्यात कुठली ताकद.''

''नूपुर... सॉरी... सॉरी... सॉरी.''

''सरकार... तुम्ही...''

''ओ! नो! आता तरी सरळ बोला ना. प्लीज... प्लीज... प्लीज.'' जयसिंह अगदी... काकुळतीने बोलला.

''अच्छा! अच्छा, चल, माफ कर दिया!'' नूपुरला हसू आवरेना. जयसिंह आपल्या या मैत्रिणीला चांगले ओळखत होता. जेव्हा ती खूप रागावते तेव्हा.... ही अशी भाषा सुरू करते. जयसिंहाला त्याचे कॉलेजचे मित्र-मैत्रिणी बऱ्याच वेळा 'सरकार' म्हणूनच हाक मारायचे. त्यांच्या गावचे ते मोठे प्रस्थ होते. अगदी खानदानी घराणं! कडक वळणाचं... घरात जे कोणी मोठे असेल त्यांना अहो-जाहो असं आदरातिथ्याने बोलवले जाई. अगदी आईलासुद्धा अहो आईसाहेब- वडील आबासाहेब- मोठा भाऊ दादासाहेब- बहीण अक्कासाहेब आणि मग मामासाहेब वगैरे... वगैरे.... वगैरे...

गावकरीही.... त्यांना मोठे सरकार. धाकले सरकार... असेच म्हणतात.... आणि ही सर्व ऐकीव माहिती असल्याने जयसिंहाचे मित्र-मैत्रिणीही त्याला बऱ्याच वेळा 'सरकार' म्हणून गंमतीने म्हणत असत. आज खूप दिवसांनी 'सरकार' शद्व नूपुरकडून ऐकून खरे म्हणजे जयसिंहाला गंमत वाटली. कॉलेज संपले होते.

''नूपुर, काँग्रॅच्युलेशन!'' त्याने गुलाबांच्या फुलांचा भरगच्च असा बुके पुढे केला.

''नेमकं कशाबद्दल अभिनंदन?''

''कशाबद्दल म्हणजे? इतरही कारणे आहेत का तुझ्याकडे?''

''तशी बरीच कारणं आहेत.''

''तुझा साखरपुडा झाल्याचे समजले.''

''अच्छा! समजले तर तुला, नशीब माझे.'' नूपुरने त्याच्या हातातला बुके घेतला. ''शिळ्या बातमीसाठी हा टवटवीत फुलांचा बुके दिल्याबद्दल थँक्स!''



''नूपुर, सध्या मी गावाकडे असतो. माझ्या हॉस्पिटलचे काम शेवटच्या टप्प्यात म्हणजे फिनिशिंग सुरू आहे. त्यामुळे सध्या मुक्काम गावाकडे असतो. बरं, आता सांग आणखीन काय विशेष?''

''अं.. सांगायचे म्हणजे....''

''ए नूपुर, सांग बाई लवकर, माझी जिज्ञासा का वाढवतेस.''

''माझ्या लग्नाची तारीख ठरली.''

''पुन्हा एकदा अभिनंदन, कोणती तारीख?''

''पुढच्या महिन्याची चोवीस तारीख.''

''नूपुर, एकदम अमेरिकेला जाणार तू, लकी आहेस. काय गं, हे अमेरिकेचे स्थळ कसे आले तुला?''

''जय, अरे मला नाही माझ्या चुलत बहिणीला बघायला आले होते. मला माहिती नसल्याने मी अचानक टपकले तिथे. त्या माणसांनी माझीही पत्रिका मागितली. तशी आमची पायलही त्यांना पसंत होती. माझे चार गुण जास्त जमले म्हणून त्यांनी मलाच होकार दिला.''

''आणि दुसरी बातमी कोणती?''

''अरे,.... दुसरी खबर म्हणजे... ते रे... ते आपलं.''

''नूपुर, आठवत नाही का? तसे असेल तर राहू दे. मी निघतो.''

''जय, तू म्हणजे अगदी असा आहेस, बरे ऐक. माझे स्वप्न साकार झाले. माझ्या गाण्याची ऑडिओ कॅसेट निघालीय. लवकरच विक्रीला येईल.''

''ओ हो!.... काँग्रॅच्युलेशन...!'' तिचा हात हातात घेत आनंदाने जयसिंह म्हणाला.

''जय, माझे स्वप्न साकारले रे...''

''ते साकारणारच होते... तुझ्या आवाजात खूप गोडवा आहे. तुझं गाणं ऐकताना मनावरून हळुवार मोरपीस फिरल्याचा भास होतो.''

''आता आहे तुझ्याकडं कॅसेट....?''

''सरकार, त्या कॅसेटचे प्रकाशन परवा आहे. तेव्हा मिळेल कॅसेट...''

''त्या कार्यक्रमाला अस्मादिकांची उपस्थिती चालेल ना?''

''तुमची उपस्थिती अगदी प्रार्थनीय आहे.'' हात जोडत नूपुर म्हणाली, नूपुरची आई वसुंधराबाई तेथे आल्या.

''जय, आता जेवूनच जा...''

''आई, तू जेवायला आग्रह केला नाहीस तरी हा जेवूनच जाणार हे माहिती आहे मला.''

''अर्थातच.'' जयने हसत सांगून टाकले.

वसुंधराबाई आत जाताच जयसिंह म्हणाला, ''नूपुर, मी खरं एका महत्त्वाच्या कामासाठी तुझ्याकडे आलोय....''

''अच्छा! महत्त्वाचे काम?...तरी म्हटले ह्याला आठवण कशी झाली माझी.''

''अगं, मी डॉक्टर झालो ते आबासाहेबांची इच्छा म्हणून. म्हणजे मला इंटरेस्ट नव्हता असं नाही गं. पण... आबासाहेबांचे म्हणणे की आपल्या गावातच मी प्रॅक्टिस करावी. गावात सुसज्ज हॉस्पिटल असावे.''

''तुला गावी हॉस्पिटल नको... असेच ना?''

''चुकतेस तू. मलाही आवडेल तेथेच राहायला. आमचे गाव खूप चांगले आहे. म्हणजे निसर्गसौंदर्य, हवामान.... आणि महत्त्वाचे म्हणजे माणसं... अजूनही माणुसकी जपणारी माणसं. जेव्हा जेव्हा जातो गावी तेव्हा प्रकर्षाने जाणवतं मला. तेथून पाय निघत नाही. आणि त्याहीपेक्षा तेथे डॉक्टरांची गरज आहे. अगदी नितांत गरज.''

''अरे, मग प्रश्न येतोच कुठे?''

''इथेच. अगदी इथेच प्रश्न येतोय. अगं आपली रिचा आहे ना....'' त्याला मध्येच तोडत नूपुरने हसत विचारले,

''आपली रिचा? की तुझी रिचा?''

''तो प्रश्न नंतर सोडवू.''

''हा प्रश्नही एवढा गहन आहे?''

''ओ हो! प्लीज बी सिरियस. रिचाचा सक्त विरोध आहे गावी राहाण्याला. तिचे म्हणणे असे की, ती कधी अशा खेडेगावात राहिली नाही आणि राहणं तिला शक्यही होणार नाही.''

''ओ! असे आहे तर...? यातून मार्ग दोन; एक तर तू आबासाहेबांना समजावून सांग किंवा रिचाला...''

''तोच तर प्रॉब्लेम आहे. अगं मी आबासाहेबांना समजावू शकत नाही. त्यांची इच्छा, त्यांची स्वप्नं गावासाठी.... आजपर्यंत त्यांनी करता येईल तेवढं केलं आहे.



म्हणून तर आमचं घराणं गावकऱ्यांच्या हृदयी वसलंय. नुसतंच आबासाहेबांचे स्वप्नही म्हणता येणार नाही. माझीही तीच इच्छा आहे.''

''मग एकच, रिचाचे मतपरिवर्तन.''

''करून दमलोय मी... हताश झालोय...''

''माझ्याकडून तुझी काय अपेक्षा आहे? मी काय करू?''

''माझ्या मनात आले आहे, रिचाला एकदा गावी घेऊन जायचे. तिला तेथे कसे वाटते... हे बघायचे. कदाचित आमचे गाव, घरची मंडळी पाहून तिचे मत बदलेल...''

''बरोबर आहे तुझे; पण मग मी काय करू? रिचाला तुझ्याबरोबर जाण्यासंबंधी...''

नूपुरचं बोलणे मध्येच तोडत जयसिंह म्हणाला,

''ती येईल, कधीही येईल. पण प्रश्न हा आहे की तिला एकटीलाच घेऊन घरी कसा जाऊ? किती केले तरी गाव आहे ते; शिवाय आमच्या घरचे काय म्हणतील? त्यांना ते पटणार नाही.''

''म्हणजे? समजा, रिचा तेथे राहायला तयार झाल्यानंतर पुन्हा तू तुझं घर घराणं... कडक शिस्त वगैरे म्हणायला लागलास म्हणजे?''

''नूपुर, तसे काही होणार नाही. मी तेव्हा नीट हाताळेन. महत्त्वाचा प्रश्न रिचाला तेथे राहायला आवडेल की नाही?.... दुसरा प्रश्न मी तिला एकटीला घेऊन जाऊ शकत नाही.''

''आले लक्षात, रिचाच्या सोबत मीही यावे असे.''

''शंभर मार्क तुला, बरोबर ओळखलेस. यात थोडी सुधारणा म्हणजे, आपला सगळा ग्रुप घेऊन पिकनिकला गावी जाऊया. बाकीचे तयार झालेत. फक्त तुझी मंजुरी बाकी आहे.''

''जय, थोडंसं कठीण आहे रे.''

''पण का?...''

''बाबा रे! पुढच्या महिन्याच्या चार तारखेला लग्न आहे माझे, हे विसरलास की काय तू?''

''उलट तुझ्या लग्नापूर्वी ही आयडिया मनात आल्याने मी स्वत:वर खूश आहे.''

''मला आई-पप्पांना विचारावे लागेल.''

''मी विचारतो...''

''अरे पण...''

''प्लीज नाही म्हणू नकोस. अगं, जाता जाता एका मित्राचे भले करून जा. तेवढेच माझे तुला आशीर्वाद लागतील.''

''जय, रिचाला हे शहर सोडून जायला नको वाटते आहे आणि मी तर भारत सोडून जाणार आहे. जय, तेथे माझे म्हणून कोण असणार रे?...'' नूपुरचे डोळे भरून आले.

''नूपुर, अगं असे काय करतेस. तुझा नवरा हा तुझा मित्रच असेल ना...''

''कोण जाणे? त्याचा स्वभाव कसा आहे. आणि नवऱ्याशिवाय कोणी नको का? अगदी माझं म्हणून? ना मित्र... ना मैत्रिणी... ना आई... ना पप्पा...''

''नूपुर रडू लागली...''

जय तिला समजावीत होता. तिचे डोळे पुसत होता. तिच्या डोक्यावरून हळुवारपणे हात फिरवत होता आणि त्या प्रेमळ स्पर्शाने नुपूरला जास्तच भडभडून आले.... खरेच तेथे अमेरिकेत आपण एकाकी होणार... ही माझ्यावर भरभरून प्रेम करणारी माणसे किती दूर असणार आहेत.

''आईसाहेब... जरा बाहेर या...''

जयने शेवटी नूपुरच्या आईला हाक मारली, वसुंधराबाई लगबगीने बाहेर आल्या.

''नूपुर, काय झाले?... जय ती का रडतेय?....''

त्याने नूपुरला जवळ घेतले.

मुद्दाम हसण्याचा प्रयत्न करीत जयसिंह म्हणाला, ''आईसाहेब, ती प्रॅक्टिस करतेय?''

''प्रॅक्टिस! कसली?....''

''बिदाईच्या रसमची.''

वसुंधराबाईंनी तिला पोटाशी घेतले. त्यांचेही डोळे वाहू लागले... हॉलमध्ये एकदम शांतता. फक्त रडण्याचा आवाज. थोडा वेळ तसाच गेला. जयसिंहने बोलणं सुरू केले.

''आईसाहेब, आमच्या ग्रुपने ठरविले आहे. नूपुरच्या लग्नापूर्वी एक मस्त पिकनिक काढायची. खास तिच्यासाठी.''



वसुंधराबाई आधीच भावनावश होत्या. त्यातच खास आपल्या नूपुरसाठी तिचा ग्रुप पिकनिक काढतोय... ह्या विचारांनी त्या आणखीन हळव्या झाल्या.

''कुठे जाणार आहात?...''

''आमच्या गावाकडे... त्या बाजूला बरेच काही पाहण्यासारखे आहे. किती वर्षे उलटलीत, सर्वांनाच माझ्या गावाला यायचे होते. होय ना गं, नूपुर?...''

''होच मुळी...''

''नूपुरला परवानगी आहे ना आईसाहेब?''

''जा... घेऊन जा... किती दिवसांची ट्रीप? केव्हा जाणार?...''

''पाच-सहा दिवस.... केव्हा जायचे हे ठरवायला पाहिजे.''

''लवकरच ठरवा. या चार-आठ दिवसांत... म्हणजे पुढे लग्नाच्या तयारीला वेळ मिळेल...''

''सरकार, परवाच्या दिवशी माझ्या कॅसेट प्रकाशनाचा समारंभ झाला की निघू या.''

''चालेल...'' जयसिंहाला खूप आनंद झाला होता. त्यानंतर जेवून त्याने त्याच आनंदात नूपुरचा निरोप घेतला.

■■■